**THE SUPERINTENDENT OF POLICE,**
**DHULE**
**(MAHARASHTRA STATE)**

## प्रेस नोट

**दिनांक** :- 17/01/2025

### MSEB चे CEO असल्याचे भासवून 13 लाख रुपयेला गंडा घालणाऱ्या 3 आरोपींना जेलबंद

दिनांक 13/09/2024 रोजी जय श्रीकृष्णा इंटरप्रायजेस धुळे या नावाने इलेक्ट्रिकल फर्मचे मालक श्री जिजाबराव आनंदराव पाटील, राहणार- धुळे यांना विज वितरण कंपनी धुळे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी तात्काळ महाराष्ट्र विज वितरण कंपीनीचे MD श्री लोकेश चंद्रा यांचे काहीतरी महत्वाचे काम आहे त्यांचा फोन घेणे असा कॉल आला. त्यानंतर थोडयाच वेळात फिर्यादी यांचे व्हाट्सअप वरती Unknown Number वरुन कॉल आला व त्यांनी मै लोकेश चंद्रा बोल रहा हू, MSEDCL के डायरेक्टर मिटींग मे बिझी हू, मेरे अंकल सुरत के हॉस्पीटल मे ॲडमिट है, उनका ऑपरेशन होना है, तो आप मुझे 8 लाख रुपये अरजेंट भेज दिजीए, मै आपके पैसे आज शाम तक लौटा दूंगा असे सांगितले.म्हणुन फिर्यादीने तात्काळ खातेधारकाच्या खातेवर नेट बँकिंगद्वारे RTGS ने 8 लाख रुपये पाठविले. त्यानंतर पुन्हा दोन तासांनी फोन आला व अंकलच्या उपचाराकरीता आणखी 5 लाख रुपये पाटविण्याची विनंती केली. यावेळी त्याने दहिसर मुंबई येथील खाते नंबर दिले. त्यावर फिर्यादी यांनी RTGS द्वारे 5 लाख रुपये पाठविले. त्यानंतर फिर्यादी यांनी सायंकाळी आरोपीच्या दिलेल्या फोन नंबरवर कॉल केला असता, त्यांनी कॉल रिसिव्ह केला नाही. त्यानंतर कार्यकारी अभियंता जोशी यांचेकडुन श्री चंद्रा यांचा नबर घेवून संपर्क केला असता, श्री चंद्रा यांनी कोणतेही पैशाची मागणी केली असल्याचे नाकारले. त्यानंतर फिर्यादी यांना त्यांचेबरोबर सायबर फसवणुक झाल्याचे समजले. त्यावरुन सायबर पोलीस ठाणे येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

मा.पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली व तपास अधिकारी पोलीस निरीक्षक श्री घुसर यांच्या सायबर पथकाने गुन्हयाचे अनुषंगाने 4 महिने अथक प्रयत्न करुन सुरत येथुन या गुन्हयाशी संबंधीत तीन आरोपी 1) यशवंत काशिनाथ पाटील 2) जयशंकर गोपाल गोसाई 3) विजय शिवहरी शिरसाठ यांना ताब्यात घेवून अटक केली.

➢ **याद्वारे पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे यांचे आवाहन** :-

**"सायबर गुन्हेगार सामान्य जनतेतुन काही लोकांना 8 ते 10 हजार रुपयांचे अमिष दाखवून बँकेत नवीन खाते उघडण्यासाठी डिपॉझिट रक्कम देतात व खाते उघडल्यानंतर त्या खात्याचे एटीएम त्या खात्याला लिंक असलेले मोबाईल सिमकार्ड त्याचेकडुन घेतात व त्या खात्यावर सायबर द्वारे केलेल्या रक्कमेचा व्यवहार करतात. अशा प्रकारे खातेदार मोठया प्रमाणार सायबर आरोपी होत असुन माझे लोकांना आवाहान आहे की, कोणीही आपले स्वत:चे नावाचे सिमकार्ड, स्वत:च्या नावाचे बँक खात्याची माहिती व एटीएम कार्ड दुसऱ्या व्यक्तीस देवू नका अन्यथा तुम्ही सुद्धा आरोपी होवू शकतात."**

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोस्टे चे पोनि श्री सुरेशकुमार घुसर, पोउनि प्रतीक कोळी, श्रेपोउनि जगदीश खैरनार, पोहेकॉ खलाणेकर, पोहेकॉ राजु मोरे, पोहेकॉ मराठे, पोकॉ तुषार पोतदार यांच्या पथकाने केली. सदर आरोपीतांना आज मा.न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे.